महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२६, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. E-१५४४४६३/H.D.-१३०१६/१/२०२६-POL४, दि. २६/०२/२०२६.

**विषय** :- AMBIS (Automated Multi-Modal Biometric Identification System) प्रणाली बंद करुन केंद्र शासनाची NAFIS (National Automated Fingerprint Identification System) प्रणाली सुरु करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. E-१५४४४६३/H.D.-१३०१६/१/२०२६-POL४, दि. २६/०२/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०२२६१२३५२१७४२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 02-03-2026 12:41:14

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) (अति.कार्य.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / आर्थिक गुन्हे / दहशतवाद विरोधी पथक/ वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह).
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था / प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/
नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सह).
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (गुन्हे).
कार्यासन अधिकारी, का क्र.२३.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

AMBIS (Automated Multi-Modal Biometric Identification System) प्रणाली बंद करुन केंद्र शासनाची NAFIS (National Automated Fingerprint Identification System) प्रणाली सुरु करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: E- १५४४४६३/H.D.-१३०१६/१/२०२६-POL४**
**(एफपीबी ०७२६/प्र.क्र.३४/पोल-४)**
**मंत्रालय, मुंबई - ४०००३२,**
**दिनांक :- २६ फेब्रुवारी, २०२६**

**संदर्भ :** १) शासन निर्णय, गृह विभाग क्र.एफपीबी-०७१६/प्र.क्र.५५०/पोल-४, दि.११.११.२०१६,
२) शासन पत्र, गृह विभाग क्र.एफपीबी-०७१६/प्र.क्र.५५०/पोल-४, दि.२४.०३.२०१७,
३) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पीईक्यु ०२२५/प्र.क्र.१८५/पोल-४, दि.२१.०५.२०२५
४) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पीईक्यु ०२२५/प्र.क्र.१८५/पोल-४, दि.२१.०५.२०२५
५) अपर पोलीस महासंचालक (का. व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/ २३/५४/AMBIS/२०९/२०२५, दि.२२.०१.२०२६
६) उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि. १७.०२.२०२ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र पोलीस दलासाठी AMBIS (Automated Multi-Modal Biometric Identification System) ही नविन प्रणाली खरेदी करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने, राज्यात गुन्हे अन्वेषण प्रक्रियेमध्ये बोटांचे ठसे, नोंदणी , जुळवणी व शोध कार्य कार्य अधिक कार्यक्षम, जलद व अचूक करण्याच्या उद्देशाने AMBIS (Automated Multi-Modal Biometric Identification System) प्रणाली कार्यन्वित आहे.

राष्ट्रीय स्तरावर एकसंध, केंद्रीकृत व परस्परसंवादी डेटाबेस निर्माण करण्यासाठी केंद्र शासनामार्फत NAFIS (National Automated Fingerprint Identification System) प्रणाली देशभर लागू करण्यात आलेली आहे. NAFIS प्रणालीद्वारे बोटांचे ठसे, तळहात ठसे व चेहरा माहिती यांचे डिजिटल संकलन, केंद्रीकृत संचयन व जलद शोध सुविधा उपलब्ध होऊन राज्यांमधील माहिती देवाणघेवाण सुलभ होते. त्यामुळे गुन्हेगार ओळख प्रक्रिया अधिक सक्षम, अचूक व वेळेची बचत करणारी ठरते.

सद्यस्थितीत AMBIS प्रणाली स्वतंत्र व मर्यादित स्वरूपाची असून राष्ट्रीय डेटाबेसशी पूर्णपणे एकात्मिक नाही. राज्यातील गुन्हे तपास कार्य अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने AMBIS

प्रणाली बंद करून NAFIS प्रणाली कार्यान्वित करणे अनिवार्य आहे. त्यानुषंगाने, AMBIS प्रणाली बंद करुन केंद्र शासनाच्या NAFIS प्रणालीचा सुरळीत व अखंडीत (Seamless) वापर करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये राज्य पोलीस दलामध्ये सध्या कार्यान्वित असलेली AMBIS (Automated Multi-Modal Biometric Identification System) ही प्रणाली बंद करुन केंद्र शासनाची NAFIS (National Automated Fingerprint Identification System) प्रणाली वापरण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

AMBIS प्रणाली बंद करुन NAFIS प्रणाली सुरु करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येत आहे:-

**ज्या वेळी पोलीस स्टेशन खालील नमूद पध्दतीनुसार NAFIS प्रणाली वापरासाठी सुसज्ज होईल याची खातरजमा झाल्यानंतरच संबंधित पोलीस स्टेशनची AMBIS प्रणाली बंद करण्यात येईल.**

अ) पोलीस स्टेशन स्तरावर NAFIS प्रणाली वापर सुरु करण्यासाठी पोलीस स्टेशननिहाय हार्डवेअर Whitelisting करणे व दोन वापरकर्ते अंमलदारांची NAFIS प्रणाली वापर करण्यासाठीशासकीय ई-मेल नोंदणी (Enrolling) कार्यवाही पूर्ण करण्यात यावी.

ब) प्रत्येक पोलीस स्टेशन मध्ये NAFIS प्रणालीसाठी आवश्यक १०० MBPS क्षमतेची Dedicated Internet सुविधा उपलब्ध करुन घ्यावी.

क) पोलीस स्टेशन युनिट **NAFIS प्रणाली वापरासाठी सुसज्ज (Enable)** होईल, याची खातरजमा करुनच AMBIS प्रणालीचा वापर बंद करुनच NAFIS प्रणाली सुरु करण्यात यावी.

ड) वरील प्रमाणे कार्यवाही दरम्यान कोणत्याही स्वरुपात पोलीस तपासामध्ये बाधा/प्रतिकूल परिणाम होणार नाही, याची दक्षता संबंधित पोलीस घटकांनी घ्यावी व याची खातरजमा राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने करावी.

इ) AMBIS प्रणालीचा वापर पूर्णपणे बंद करुन NAFIS प्रणालीचा वापर सुरु करण्याच्या प्रक्रियेवर अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे व पोलीस अधीक्षक, तांत्रिक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांनी प्रभावी संनियत्रण (Supervision) ठेवावे.

२. AMBIS प्रणालीमध्ये असलेला जुना उपलब्ध डेटा सुरक्षितपणे व अखंडीतपणे NAFIS प्रणालीमध्ये स्थलांतरित करण्याची जबाबदारी “अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग (CID), महाराष्ट्र राज्य पुणे” या कार्यालयाची राहील.

३. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) सोबत समन्वय साधून राज्यातील सर्व पोलीस स्टेशनमध्ये NAFIS वर्कस्टेशन्स त्वरीत कार्यान्वित होतील याची दक्षता घेण्यात यावी.

४. संदर्भाधीन क्र. ३ व ४ येथील शासन निर्णयांन्वये AMBIS प्रणाली वापराअंतर्गत workflow Simplification व Web API Development बाबत मान्यता दिलेले शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे. व तद्नुषंगिक, M/s. IDEMIA कंपनीला दिलेले कार्यादेश रद्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. उपरोक्त संपूर्ण कार्यवाही विहीत कालमर्यादेत पूर्ण करण्याची जबाबदारी अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतां २०२६०२२६१२३५२१७४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARCHANA VILAS WALZADE

Digitally signed by ARCHANA VILAS WALZADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=C425B577C1B133FB91A3D8759411F27689C7C6E2480079FC88B0322C01CFD264, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B4E19876AB3EEC36E3A3B988441648AB87470CDFE66B14CFBE7AC9BD770485C1, cn=ARCHANA VILAS WALZADE
Date: 2026.02.26 12:38:03 +05'30'

(अर्चना वालझाडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

- मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
- मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
- मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
- सर्व सन्मानिय संसद सदस्य, विधानसभा व विधानपरिषद सदस्य
- मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२

- मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
- सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
- मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०००३२
- प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
- प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
- प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई
- प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
- सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग, मुंबई-४०००३२
- प्रबंधक, मा.मुंबई उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई (पत्राने)
- पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
- सर्व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
- पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई
- अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
- महासमादेशक, होमगार्डस,महाराष्ट्र राज्य,मुंबई
- महासंचालक (न्यायिक व तांत्रिक), महाराष्ट्र राज्य, मुंबई
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई
- सर्व पोलीस आयुक्तालये, महाराष्ट्र राज्य, मुंबई
- सर्व अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
- सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
- सर्व पोलीस उप महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
- सर्व पोलीस अधिक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
- अधिदान व लेखा अधिकारी/निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
- निवडनस्ती /पोल-४